# मिरा भाईंदर महानगरपालिका

स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग,
भाईंदर (प.), ता.ठाणे-४०११०१ दुरध्वनी क्रं.२८१९२८२८

पाणी पुरवठा व मलनि:सारण विभाग


**जा.क्र.मनपा/पा.पु. व मलनि/1195 /2024-25** **दि.06 /09/2024**

प्रति.
जनसंपर्क अधिकारी
मिरा-भाईदर महानगरपालिका

**विषय :-** जाहिरात महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर व स्थानिक वृत्तपत्रात प्रसिद्ध करणे बाबत.

**मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील खाजगी पाणी स्त्रोतांची नोंदणी व टँकर पुरवठाधारकास परवाना देणे** या कामाकरीता सोबत जोडलेली जाहिरात महानगरपालिकेच्या अधिकृत संकेतस्थळावर व स्थानिक वृत्तपत्रात प्रसिद्ध करण्यात यावी. तसेच सदर जाहिरात प्रसिद्ध केल्यानंतर या विभागास वृत्तपत्रांच्या प्रती पुरविण्यात याव्यात. ( दै. लोकमत, दै. पुढारी )

**(दिपक खांबित)**
**शहर अभियंता**
**मिरा-भाईंदर महानगरपालिका**

प्रत :- सिस्टीम मॅनेजर
(वेबसाईट प्रसिध्दिकरीता)

# मिरा भाईंदर महानगरपालिका

स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग,
भाईंदर (प.), ता.ठाणे-४०११०१ दुरध्वनी क्रं.२८१९२८२८

पाणी पुरवठा व मलनि:सारण विभाग

## // जाहिरात //

**मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील खाजगी पाणी स्त्रोतांची नोंदणी व टँकर पुरवठाधारकास परवाना देणे**

(प्रशासकिय ठराव क्र.135 दि.26/08/2024 अन्वये टँकरव्दारे पाणी पुरवठा धोरण निश्चित करण्यात आलेले आहे.)

1) मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात सद्यस्थितीत अस्तित्वात असलेल्या तसेच वापरात असलेल्या खाजगी पाणी स्त्रोतांची नोंदणी संबंधीत खाजगी पाणी स्त्रोत मालकाने महानगरपालिकेत करणे बंधनकारक आहे.
2) त्यासाठी खाजगी पाणी स्त्रोत मालकानी त्यासंबंधीचे अधिकृत दस्ताऐवजासह महानगरपालिकेस नोंदणीसाठी अर्ज करणे आवश्यक आहे.
3) तसेच खाजगी पाणी स्त्रोतधारकाने सदर स्त्रोतामधील पाणी पिण्यासाठी /घरगुती वापरासाठी अथवा व्यावसायिक वापरासाठी पुरवठा करण्यात येतो. त्याची माहिती देणे आवश्यक आहे.
4) त्यासाठी खाजगी पाणी स्त्रोताचे पाण्याचे नमुने सार्वजनिक आरोग्य प्रयोगशाळेत तपासणी करुन चाचणी अहवाल सादर करणे.
5) तसेच त्यानंतर प्रत्येक महिन्याला पाण्याचे नमुने तपासणी करणे बंधनकारक राहील.
6) तसेच सदरचे खाजगी पाणी स्त्रोतातील पाणी मागणीनुसार फक्त मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातच पुरवठा करणे बंधनकारक राहील.
7) खाजगी पाणी स्त्रोतातील पाणी पुरवठा करण्यासाठी वापरण्यात येणारे खाजगी टँकरर्स हे महानगरपालिकेने परवाना दिलेल्या परवाना धारकाचेच असणे बंधनकारक आहे.
8) दि.11/09/2024 ते दि.10/10/2024 रोजी 12.00 वाजेपर्यत मिरा-भाईंदर महानगरपालिका, मुख्य कार्यालय, पाणी पुरवठा व मलनिसारण विभाग, पहिला मजला, भाईंदर (प.) या विभागात टँकर परवान्यासाठी स्वतंत्र अर्ज करुन परवाना घेणे बंधनकारक राहील.
9) मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या संकेत स्थळावर सदर जाहिरात उपलब्ध आहे. परवाना घेणेकरीता विहीत नमुन्यातील अर्ज व अटीशर्तीसह पाणी पुरवठा विभागात फॉर्म फि रु.500/- अदा करुन उपलब्ध करुन घ्यावा.
10) विहीत कालावधीत परवाना न घेता खाजगी टँकरव्दारे पाणी पुरवठा करताना आढळून आल्यास रु.10,000/- इतका दंड आकारण्यात येईल.

यासाठी महानगरपालिकेमार्फत महानगरपालिकेने निश्चित केलेल्या खाजगी टँकरर्सने पाणी पुरवठासाठीच्या धोरणानुसार परवाना घेणे आवश्यक आहे.

**शहर अभियंता**
**मिरा-भाईंदर महानगरपालिका**

**ठिकाण :- भाईंदर**
**दिनांक :- 06/09/2024**